UGC Approved Sr. No. 49366

SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED
IMPACT FACTOR SJIF 2016 6.177




An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

5

310 आदिवासी शिक्षण– दशा आणि दिशा
*मोरे रविंद्र गोरक्षनाथ (1395-1396)*

311 ग्रामीण विकासातील पंचायतराज संस्थांची भूमिका
*तुवर जालिंदर गोरक्षनाथ (1397-1398)*

312 अकोला जिल्हयातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन
*डॉ. कु. प्राजक्ता वि. पोहरे & डॉ. रामेश्वर मा. भीसे (1399-1410)*

313 जीएसटी कर प्रणालीची संरचना आणि परिणाम
*पाऊलबुध्दे अनुराधा रामभाऊ & प्रा. डॉ. अशोक कोरडे (1409-1411)*

314 कृषी विकास योजनांचा शेती क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा चिकीत्सक अभ्यास
*डॉ. राजेंद्र भोसले & गायकवाड ज्योती नानासाहेब (1412-1417)*

315 स्वचछता अभियानातंर्गत राबविण्यात येणा-या स्वच्छभारत अभियानाचा अभ्यास
*डॉ सुहास आव्हाड & दिगांबर ज्ञानदेव नलगे (1418-1420)*

316 आर्थिक सुधारणा काळातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा महाराष्ट्र राज्य सकल अंतर्गत उत्पादनावरील परिणाम
*प्रा. मदन शेळके (1421-1426)*

317 स्वंयसहाय्यता समुह बॅक संलग्न कार्यकमांचा आढावा
*प्रा. संतोष एम. वाघमारे & डॉ. अजय पी. कुटे (1427-1430)*

318 भारतात परकीय भांडवलाची भूमिका
*प्रा. वैषाली योगराज भेले (1431-1435)*

319 सेंद्रिय शेती पदधती काळाची गरज
*कु. रुपाली जाधव (1436-1437)*

320 शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्त्या : 2011 ते 2017 (संदर्भ : नाशिक जिल्हा)
*प्रा. डॉ. अनिल डी. पवार (1438-1442)*

321 शाश्वत विकासासाठी सेंद्रीय शेतीचे महत्त्व : एक अभ्यास
*प्रा. एम.व्ही. हिरे (1443)*

322 वस्तु व सेवा कर – वाटचाल आणि प्रत्यक्ष आकारणी
*प्रा. डॉ. सुनील पं. उगले (1444-1449)*

323 मध्ययुगीन भारतातील उद्योग, व्यापार व त्याचा प्रभाव
*प्रा. तुळशीदास मोकल (1450-1453)*

324 जागतिकीकरणाचा कृषीमाल विपणन व्यवस्थेवरील परिणाम
*प्रा. डॉ. आर के जाधव (1454-1460)*

325 भारतातील विविध कृषी आधारित उदयोगांच्या समस्या आणि संधी
*श्री. गणेश तुकाराम टाव्हरे (1461-1475)*

# जागतिकीकरणाचा कृषीमाल विपणन व्यवस्थेवरील परिणाम

**प्रा.डॉ. आर के जाधव**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र), म. स. गा. महाविद्यालय मालेगांव जि. नाशिक

**प्रास्ताविक** — १९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला व त्यानंतर भारतात मोठ्या प्रमाणात जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरणाचे वारे वाहु लागले आहेत. १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटना स्थापन झाली. भारताने या संघटनेचे सभासदत्व स्वीकारू नये म्हणून उलटसुलट चर्चा सुरू झाली होती. परंतु १३६ देशांनी सभासदत्व स्वीकारले असल्याने भारताला या संघटनेपासून स्वतंत्र राहता येवू शकत नव्हते. जागतिकीकरणामुळे भारतीय शेतीवर विपरीत परिणाम होतील अशा प्रकारची चर्चा सुरू झाली होती.

**व्यापार व जकात विषयक सर्वसाधारण करार (GATT)** — पहिल्या महायुध्दानंतर १९२९—३० ची महामंदीमुळे निर्माण झालेली आर्थिक अस्थिरता आणि युध्दात सहभागी झालेल्या अनेक देशांच्या अर्थव्यवस्था खिळखिळया झाल्या यातूनच जगाची वाटचाल दुसऱ्या महायुध्दाकडे सुरू झाली होती. जगामध्ये जवळपास सर्वच देश मित्र राष्ट्रे व शत्रु राष्ट्रे अशा दोन गटात विभागले गेले होते. देशादेशांमध्ये कटुता निर्माण झाली होती. सर्वांनाच आपापल्या अर्थव्यवस्थांची स्थिती सुधारणे अग्रक्रमाचे काम होते. अनेक देशांनी व्यापारावर बंधने लादलेली होते. ती टप्याटप्याने दूर केल्यास व्यापार वृध्दी होणे शक्य होते. यातून उत्पादनालाही चालना मिळेल असे वाटू लागले होते. या पार्श्वभूमीवर १९४४ साली अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी ब्रेटनवूड्स येथे जगातील देशाची एक परिषद बोलावली. या परिषदेची फलश्रुती म्हणजे आर्थिक मदतीसाठी जागतिक बॅंक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दोन संस्थांची स्थापना करण्यात आली. तसेच जागतिक व्यापाराचे फायदे घेण्याची सर्वांना संधी मिहावी तसेच जागतिक व्यापाराचे नियमन व दिशा या दृष्टीने स्वतंत्र यंत्रणा असावी या हेतूने व्यापारविषयक (GATT- General Agreement on Trade and Tarriffs) करार करण्याचा प्रस्ताव समोर आला. देशादेशामध्ये सहकार्याची भावना असावी आणि देशा—देशांच्या आयात निर्यातीवर कोणत्या दराने प्रशुल्क किंवा जकातदार असावा. यावरून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी बैठका झाल्या त्या बैठकांचे फलित म्हणजेच 'गॅट' ची स्थापना होय.

३० ऑक्टोबर १९४६ मध्ये ब्रेटनवुड्स येथे २३ राष्ट्रांची बैठक होऊन गॅट करार संमत झाला. नंतर २३ राष्ट्रांनी केलेल्या करारात अनेक राष्ट्रे समाविष्ट झाली. १९९३ मध्ये १२७ राष्ट्रे गॅटचे सदस्य होते. भारत हा गॅटचा संस्थापक सदस्य आहे. गॅट करारातील तरतूदी सर्व सभासद देशांना बंधनकारक असून त्यांचे उल्लंघन कोणालाही करता येणार नाही. अशी तरतूद करण्यात आली आहे.

**गॅट करारातील तरतुदी** — गॅट कराराने आंतरराष्ट्रीय व्यापाराची बाजारपेठ मुक्त करण्यात महत्वाची भूमिका बजावली. या प्रयत्नामध्ये काही मर्यादा जाणवल्या. गॅटच्या मर्यादा दूर करून अधिक सक्षमतेने जागतिक व्यापार मुक्त झाला पाहिजे. असा मतप्रवाह वाहू लागला. आंतरराष्ट्रीय व्यापारात पक्षपात होवू नये. म्हणून सीमा शुल्क व्यापार क्षेत्र स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली. १९८६ मधील 'उरूग्वे फेरी' मध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधी नव्याने वाटाघाटी करण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी जकात आणि जकाती व्यतिरिक्त उपाय, शेती अनुदान, वस्त्र व कापड उद्योग बौध्दिक संपदा, हक्क इ. संबंधी निर्णय घेण्यात आले. गॅट हा एक आंतरराष्ट्रीय करार होता. १९९० नंतर गॅटच्या स्वरूपात बदल करून त्याऐवजी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्याबाबत विचार परामर्श झाला. याचे मुख्य कारण म्हणजे डंकेल प्रस्ताव व या प्रस्तावाची अंमलबजावणी होय.

**डंकेल प्रस्ताव** — सन १९४६ मध्ये जिनिव्हा येथील परिषदेत जकाती आणि व्यापारविषयक सर्वसामान्य करार अस्तित्वात आला होता. हा करार वस्तू व्यापार आणि आयात जकाती या बाबीपुरताच मर्यादित होता. अविकसित आणि विकसनशील देशांच्या हिताच्या दृष्टीने शेती मालाचा व्यापार गॅट करारातून वगळला होता. सन १९८६ मध्ये उरूग्वे शहरात गॅटच्या आठव्या चर्चा फेरीत शेतीक्षेत्र सेवाक्षेत्र, गुंतवणूक आणि बौध्दिक संपदा हे विषय गॅटच्या कक्षेत आणण्याबाबत चर्चा सुरू झाली. सन १९९० च्या ब्रुसेल्स येथील परिषदेतही यावर एकमत झाले नाही. पुढे १९९१ साली गॅटचे संचालक जनरल आर्थर डंकेल यांनी सहभागी देशांसमोर कराराचा एक मसुदा ठेवला. त्यांनी सर्वच प्रकारच्या वस्तू आणि सेवा गॅटच्या नियंत्रणाखाली आणण्याच्या संदर्भात जो मसुदा तयार करून सदस्य राष्ट्रासमोर ठेवला त्यास डंकेल प्रस्ताव या नावाने ओळखले जाते. या प्रस्तावाप्रमाणे मुक्त व खुला आंतरराष्ट्रीय व्यापार जगाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. जकात तसेच जकोतत्तर अडथळयांमुळे मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळा निर्माण होवू नये म्हणून डंकेल प्रस्ताव महत्वाचा होता.

**जागतिक व्यापार संघटनेचे शेतीवरील परिणाम** — भारताने १९९१ पासून जलद आर्थक विकासासाठी खुल्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार केला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची शेतीप्रधानता लक्षात घेऊन आर्थिक सुधारणांच्या काळात विकासाच्या सर्वसमावेशक प्रयत्नांवर भर दिला जात आहे. जागतिक व्यापारातील सुसूत्रता आणि समानतेच्या तत्वावरील लाभासाठी १ जानेवारी १९९५ रोजी स्थापना झालेली आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या शेतीविषयक तरतूदींचे भारतीय शेतीवर संमीश्र परिणाम झालेले आहेत.

अ) **अनुकूल परिणाम** जागतिक व्यापार संघटनेमुळे भारतीय शेती क्षेत्राच्या महत्व पाडले असून शेतीचे आधुनिकीकरण व विकासासंदर्भात खालील संधी निर्माण झालेल्या आहेत.

१) **जागतिक बाजारपेठ** जागतिक व्यापार संघटनेमुळे भारतीय शेतमालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध झालेली आहे. द्राक्ष, डाळींब, साखर, कांदा, बटाटे अशा नगदी शेतमालास अरब व युरोपातील बाजार उपलब्ध झालेला आहे. नगदी पिकांप्रमाणेच दुग्धजन्य पदार्थ, फुले यांचीही जगाच्या बाजारात विक्री करण्याची संधी मिळालेली आहे.

थोडक्यात विपणनाच्या जागतिक संधी हे जागतिकीकरणाचे ठळक वैशिष्ट्ये ठरली असून त्यात शेतमालाचे स्थान अग्रणी आहे.

२) **परकीय चलनाची उपलब्धता** डॉलर मिळविणारा शेतकरी असा बदल (WTO) माध्यमातील तरतुदींचा परिणाम म्हणून झालेला आहे. मागणीनुसार उत्पादनास महत्व देण्याचे तंत्र शेतकऱ्यास अवगत झालेले आहे. शाश्वत उत्पन्नाची हमी मिळण्यास मदत झालेली आहे. शेतमाल निर्यातीद्वारे मिळणाऱ्या परकीय चलनामुळे शेतकऱ्यांचा जीवनमान दर्जा सुधारलेला आहे. थोडक्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या बुध्दिवंतांप्रमाणेच कष्टकरी शेतकऱ्याला मिळणारे परकीय चलन हा जागतिक व्यापार संघटना माध्यमातील संधीचा परिपाक आहे.

३) **आधुनिक, अद्ययावत व व्यापारी शेती** उदरनिर्वाह ऐवजी व्यापारी दृष्टिकोनातून शेती व्यवसायात दिले जाणारे महत्व हा सकारात्मक बदल जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमतून झालेला आहे. शेतीचे यांत्रिकीकरण आधुनिकीकरणाच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपलब्धी मिळण्यास मदत झालेली आहे. शेतीविषयक यंत्रसामग्री अद्ययावत तंत्रज्ञान यांची खुली देवान घेवान शक्य झाल्याने भारतीय शेतीचा चेहरा मोहरा बदलण्यास मदत झालेली आहे. जागतिक स्तरावरून शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाल्याने विपणनाच्या कार्यकक्षा रूंदावून शेतकऱ्यांच्या पत व प्रतिष्ठेत वाढ होण्यास मदत झालेली आहे.

४) **रास्त स्पर्धा मूल्य** WTO च्या माध्यमतून स्पर्धेतून रास्त मूल्य मिळण्याच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. योग्य व आधुनिक आदानांचा अवलंब करून उत्पादन खर्च तुलनात्मकदृष्टया कमी करून जगाची बाजारपेठ मिळवणि शक्य झाले आहे. शेतमाल बाजारविषयक शाश्वती शेतकऱ्यांचा उत्साह वाढविण्यास कारणीभूत ठरलेली आहे. थोडक्यात रास्त स्पर्धा मूल्य व त्याच्या निकषांची पूर्तता अशी संधी अस्तित्वात आहे.

५) **कृषी व्यवस्थापन संधी** कृषी व्यवसायाच्या व्यवस्थापन विषयक तत्वांची अंमलबजावणी करण्याचे WTO च्या माध्यमतून उपलब्ध झाले आहे. कृषी व्यवसायाचे SWOT विश्लेषण करून शेतमालाच्या कच्च्या दुव्यांचे रूपांतर लाभात करण्याच्या दृष्टीने मिळालेल्या कृषी व्यवस्थापन विषयक संधी दिशा दर्शक ठरलेल्या आहेत. हॉलंड, इस्त्राईल अशा देशातील कृषी विकासाच्या प्रतिमानाचा अवलंब करून उत्कर्षाच्या संधी मिळविणे शक्य झाले आहे.

६) **पशुधन माध्यमातील उत्पन्नाच्या संधी** दुग्धव्यवसाय, मांस यादृष्टीने संकरीत जातीचे पशुधन व्यापारविषयक करार व परस्पर सहकार्य या माध्यमातून मिळण्यास मदत झालेली आहे. शेती व्यवसायाला संलग्न म्हणून पशुपालन दुग्ध व्यवसायास चालना मिळाली असून त्याद्वारे वाढीव उत्पन्नाच्या संधी निर्माण झालेल्या आहेत.

७) **आदानांची उपलब्धी** भारतात सध्या दुसऱ्या टप्प्यातील हरितक्रांती सुरू असून त्यात नवीन आर्थिक सुधारणा तसेच WTO मुळे निर्माण झालेल्या संधी मुख्यत्वे कारणीभूत आहेत. नैसर्गिक व मानवनिर्मित अनिश्चिततांनी घेरलेल्या शेतीव्यवसायाची आवश्यक आदाने उपलब्ध झाल्याने सुटका होण्यास मदत झालेली आहे. संकरीत बी—बियाणे, खते, कीटकनाशके, फवारणी यंत्रे, जलसिंचनविषयक आधुनिक पध्दती, अवजारे, उपकरणे अशा आदानांमुळे श्रम व वेळेची बचत होवून शेतीची कामे होण्यास मदत झालेली आहे.

ट्रॅक्टरद्वारे केली जाणारी शेती, रेनगनचा अवलंब, मातीपरीक्षण व गरजेनुसार पाणीपुरवठा असे बदल ही त्याची प्रमुख उदाहरणे आहेत.

८) **कृषी संशोधन** संशोधन ही कृषी विकासाची मूलभूत गरज असून खुली निती व खुल्या व्यापाराचा स्वीकार यामुळे त्यास चालना मिळालेली आहे. प्रयोगशाळा ते शेतजमीन असा सहसंबंध ( Lab to Land) दृढ करण्याच्या दृष्टीने जागतिक धर्तीवर प्रयत्न केले जात आहेत. प्रत्यक्ष शेतीविषयक समस्या सोडवून शेतीच्या उत्कर्षाच्या दृष्टीने मौलिक संशोधन संधी आंतरराष्ट्रीय संस्था, विकसित देश आणि शैक्षणिक भागीदारी यामुळे उपलब्ध झाल्या आहेत.

९) **सेंद्रीय व शाश्वत शेती** रासायनिक शेतीमुळे क्षारपड जमिनीचे वाढते प्रमाण, जमिनीचा कस व कमी उत्पादकता असे दुष्परीणाम निर्माण झालेले आहेत. शेतीविषयक WTO चे निकष हे दुष्परिणाम टाळण्याच्या दृष्टीने महत्वाचे असून त्याद्वारे सेंद्रीय व शाश्वत शेतीला वाव मिळावा यादृष्टीने आखणी केली जात आहे. मूलद्रव्य, खते, कीटकनाशके, यासंदर्भातील कडक निकषांमुळे शाश्वत व सेंद्रीय शेतीला महत्व देणे ही बाब अपरिहार्य ठरली आहे.

ब) **प्रतिकूल परिणाम —**

१) **बौधिक स्वामीत्वाच्या अडचणी** उरूग्वे करारानुसार बौध्दिक मालमत्तेचा हक्क शेतीलाही लागू करण्यात आला आहे. जागतिक बाजारपेठेत या स्वामीत्व अधिकाराने विशेष स्थान प्राप्त केले आहे. दरवर्षी ५ लाख पेटंट मिळविले जातात. भारतातील वस्तूंचे पेटंट विदेशात घेतले जातात आणि पेटंट मिळविण्यासाठी आपल्याला प्रत्येक वेळी कोर्टाचे दार ठोठावे लागते. याऐवजी योग्य वेळी पेटंट मिळविले तर भारताला पश्चाताप करण्याची वेळ येणार नाही. पेटंट करारानुसार एखाद्या देशाने बियाणांची आयात सुरू केली की ताबडतोब पेटंट कायद्याचा अमल सुरू होतो. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून भारतीय शेतीत परकीय कंपन्या घुसू लागल्या आहेत. करार शेती व कंपन्यांची शेती ही WTO ची देन असून जर कंपन्यांनी शेतीचा ताबा घेतला तर सीमांत शेतकरी व अल्पभूधारक शेतकरी त्यांच्या स्पर्धेत टिकू शकणार नाहीत.

२) **सक्तीची शेतमालाची आयात** जगतिक व्यापार संघटनेच्या करारातून शेतमालाची आयात यापुढे देशाच्या गरजेवर अवलंबून राहणार नाही. सध्याच्या परिस्थितीत शेतमालाला योग्य भाव मिळत नसताना परदेशातून येणाऱ्या स्वस्त धान्याची भर पडत असल्याने भारतीय शेतकऱ्यांची स्थिती गंभीर होणार आहे. विकसित देशांमध्ये अमेरिका व युरोपीय देश भारतातून येणारा माल प्रकृतीला हानिकारक आहे असे कारण देवून त्या मालाला विरोध करतात. त्याचा परिणाम भारताच्या कृषी निर्यातीवर होणार आहे.

३) **वस्तु पेटंटचा शेती क्षेत्राला धोका** पेटंट दिले जाते म्हणजे एकच वस्तू विविध प्रक्रियेने अनेक कंपन्या बनवितात. मात्र डंकेल प्रस्तावातील वस्तू पेटंट फक्त एकाच उत्पादकाला ती वस्तू उत्पादन आणि विक्री करण्याचा हक्क मिळेल असे केल्यामुळे बाजारात मक्तेदारी निर्माण होईल. वस्तू पेटंटचा हक्क जर बहुराष्ट्रीय कंपनीला मिळाला तर त्यामुहे त्या वस्तुंच्या किमती वाढतील. शेतीतील बी—बियाणे, खते, जंतुनाशके, यांच्या देखिल किमती वाढतील. त्यामुळे शेतीमाल उत्पादन खर्चही वाढेल. त्यामुळे शेतीव्यवसाय करणे फायदेशीर ठरणार नाही.

४) **दर हेक्टरी उत्पादन कमी**

भारतात शेतीवर ५८टक्के लोकसंख्या अवलंबून आहे. विकसित देशात हे प्रमाण ३ ते ६ टक्के आहे. भारताचे अंदाजपत्रक त्रुटीचे आहे. भारतात शेतीउत्पादन आणि संशोधन याकडे दुर्लक्ष होते. भारत हा कृषीप्रधान देश असून भारतीय शेतीची उत्पादकता तुलनेने खुपच कमी आहे. दक्षिण कोरियात खताचा प्रति हेक्टरी ४०५ किलो वापर होतो. भारतात हे प्रमाण ७६ किलो आहे. यामुळे भारतीय शेती परकीय स्पर्धेत मागे पडत आहे.

**५) शेतमालाच्या किमती आणि जागतिक बाजारपेठ**

विकसित देशात दर हेक्टरी शेतमालाचे उत्पादन अधिक असून हे देश जागतिक बाजारपेठेत शेतमाल निर्यातीत स्पर्धा करतात. शेतमालाच्या निर्यातीसाठी मोठया प्रमाणात अनुदाने दिली जातात. जागतिक बाजारेपठेत शेतमालाच्या किंमती दिवसेंदिवस घसरत आहेत. भारतात शेतमालाचा उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात देण्यांत येणाऱ्या अनुदानाची रक्कम इतर देशांच्या तुलनेत अल्प आहे. त्यामुळे जागतिक स्पर्धेच्या संदर्भात भारतातील शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होणार आहे.

**६) नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश**

जगतिकीकरणामुळे विषुवृत्तीय प्रदेशातील नैसर्गिक संपत्तीचा जवळजवळ ५५ टक्के भाग नष्ट झाला आहे. त्यामुळे जीव जातीही संपुष्टात येत आहेत. परिणामी जैविक विविधतेचाही नाश होत आहे. मोठया प्रमाणावर जंगलतोड झाल्यामुळे प्रदुषणातदेखील वाढ होत आहे.

**भारतातील निवडक कृषी उत्पादनाची आयात निर्यात —**

१ जानेवारी १९९५ मध्ये अस्तित्वात आलेली जागतिक व्यापार संघटना स्थापन होऊन २० वर्षे झाली. भारत या संघटनेचा संस्थापक सभासद आहे. विकासाचा मार्ग व्यापारातून उगम पावला आहे. विविध देशात होणारा व्यापार हाच तर खरा परकीय गंगाजळीचा प्रश्न सोडवितो. आणि गरज असलेल्या गोष्टींची आयात करण्यासाठी मार्ग खुला होतो.

**भारतातील शेतमाल आयात निर्यातीचा तपशील (आकडे को.रू.)**

| वर्ष | एकूण शेतमाल आयात | एकूण आयात वाटा (%) | एकूण शेतमाल निर्यात | एकूण निर्यात वाटा (%) |
|---|---|---|---|---|
| २००१—०२ | १६२५६.६१ | ६.६३ | २९७२८.६१ | १४.२२ |
| २००२—०३ | १७६०८.८३ | ५.९२ | ३४६५३.९४ | १३.५८ |
| २००३—०४ | २१९७२.६८ | ६.१२ | ३७२६६.२२ | १२.७० |
| २००४—०५ | २२८११.८४ | ४.५५ | ४१६०२.६५ | ११.०८ |
| २००५—०६ | २१४९९.२२ | ३.२६ | ४९२१६.९६ | १०.७८ |
| २००६—०७ | २१६३७.८६ | ३.५३ | ६२४११.४२ | १०.९२ |
| २००७—०८ | २९९०६.२४ | २.९६ | ७९०३९.७२ | १२.०५ |
| २००८—०९ | ३७१८३.०३ | २.७१ | ८५९५१.६७ | १०.२२ |
| २००९—१० | ५९५२८.३४ | ४.३७ | ८९३४१.३३ | १०.५७ |
| २०१०—११ | ५६१९६.० | ३.५० | १२०१८५.४८ | १०.४७ |

संदर्भ: वाणिज्य मंत्रालय, महासंचालक वाणिकी आणि सांख्यिकी विभाग, भारत सरकार.

तक्त्यानुसार भारताच्या शेतमाल आयात–निर्यातीसंदर्भात तपशीलात स्पष्टीकरण मिळते. देशाच्या व्यापारात शेतीचे अनन्यसाधारण महत्व असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. सन २००१–०२ मध्ये भारताच्या एकूण आयातीत व निर्यातीत शेतमालाचा वाटा अनुक्रमे ६.६३ टक्के व १२.२२ टक्के होता. सन २००५–०६ मध्ये आयात व निर्यातीतील शेतीचा वाटा अनुक्रमे ३.२६टक्के व १०.७८ टक्के असा कमी झालेला आहे. सन २००९–१० मध्ये शेतीविषयक आपत्तीमुळे एकूण आयातीतील वाटा ४.३७ टक्के असा वाढलेला असून निर्यात १०.५७ टक्के अशी झालेली आहे. जागतिक मंदीचा परिणाम शेती उत्पादन व पर्यायाने आयात निर्यातीवर झाल्याचा दिसून येतो.

शेतमाल आयात व निर्यात असा स्वतंत्र विचार करता आयातीपेक्षा निर्यात जास्त असल्याचे स्पष्ट होते. तक्त्यातील आकडेवारी विचारात घेता शेतमालाची आयात कमी झालेली असली तरी शेतमाल निर्यातीत वाढ न झाल्याचे दिसून येते. WTO च्या शेतमला व्यापारविषयक तरतूदी जागतिक स्पर्धा ही याची प्रमुख कारणे असल्याचे दिसून येते.

भारतातील बासमती व्यतिरिक्त उत्पादन होणारा तांदूळ तसेच गहू जागतिक स्तरावर स्पर्धाक्षम नाही. निर्यातीतील संख्यात्मक घट, गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय किंमतीत आलेली घसरण यामुळे तेलबीया उत्पादनाच्या निर्यातीत भरताला मोठी हानी सहन करावी लागली आहे. चहा, कॉफी, मसाले आणि तंबाखू सारख्या पारंपारिक उत्पादनाच्या निर्यातीत मोठा फटका भारताला बसला आहे. सागरी उत्पादने, पशु उत्पादने आणि फलोत्पादने यांनी आपल्या निर्यातीची गती कायम ठेवली आहे. थोडक्यात जागतिक व्यापार संघटनेच्या नंतरच्या काळात जागतिक बाजारपेठेत भारताच्या काही उच्च किंमतीच्या उत्पादनांना मोठी संधी मिळाल्याची दिसते.

आयातीच्या बाबतीत पाहिले तर भारताने मुक्त धोरण स्वीकारल्यानंतर जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात येऊनही प्राथमिक वर्षात भारताच्या आयातीत फारसा फरक पडला नाही. परंतु आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमती कोसळल्याचा परिणाम म्हणून भारताची आयात वाढल्याचे दिसून येते.

**सारांश** – जागतिकीरणाच्या काळात भारतीय शेती व शेतमाल विपणन व्यवस्था यामध्ये अमुलाग्र बदल झालेले आहे. व्यापारविषयक सर्वसाधारण कराराअंतर्गत शेतमाल आयात–निर्यात संदर्भात महत्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत. गॅटचे जनरल सेक्रेटरी आर्थर डंकेल यांनी गॅट करारामध्ये बदल सुचविण्यासाठी जो प्रस्ताव तयार केला तो डंकेल प्रस्ताव म्हणून ओळखला जातो. डंकेल यांच्या शिफारशीनुसार जागतिक व्यापाररचना नियंत्रित करण्यासाठी जागतिक व्यापार संघटना अस्तित्वात आली आहे. भारत या व्यापार संघटनेचा स्थापनेपासून सभासद आहे. त्यामुळे या व्यापार संघटनेशी बांधील राहून जागतिक व्यापारात सहभाग नोंदणी भारतास क्रमप्राप्त झाले. याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष परिणाम भारतीय शेती, शेतीसाठी दिली जाणारी अनुदाने, रासायनिक खते व किटकनाशके यांच्या वापराचे आंतरराष्ट्रीय निकष मान्य करावे लागेल. त्यामुळे भारतीय शेती व शेतमाल विपणन व्यवस्था यात मोठे बदल दिसून येतात. आज भारतीय शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी जागतिक बाजारपेठ खुली झाली आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धामुल्य शेतकऱ्यांना मिळणे शक्य होत आहे. असे असले तरी शेतमाल उत्पादनाची गुणवत्ता टिकविणे, रासायनिक खते, बी–बियाणे यांच्या वाढत्या किंमती यामुळे शेती उत्पादनाचा खर्च वाढला आहे.

___य लहान व अल्प भूधारक शेतकऱ्यांना मोठा भांडवली खर्च करणे शक्य होत नाही. परिणामी त्यांच्या उत्पन्न वाढीवर व आर्थिक स्तर सुधारण्यावर मर्यादा असल्याचे स्पष्ट होते. तरीही जागतिकीकरणाने आव्हानांबरोबर संधी देखील निर्माण करून दिल्या आहेत. या संधी सर्व स्तरातील शेतमाल उत्पादक, व्यापारी यांना जर घेता आल्या तर भारतीय शेती जागतिक दर्जाची होईल आणि भारतीयांचा सामाजिक स्तर आधुनिक जागतिक विपणन व्यवस्थेमुळे उंचावण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची —**


१) *गोविलकर विनायक महादेव, ''जागतिकीरण आणि जागतिक व्यापार संघटना'', ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह नाशिक*

२) *घानेकर वि. वि., ''जागतिकीकरण व भारतातील शेतकरी, सहकारी संस्था उद्योग व बँका'', इन्स्टिटयुट ऑफ रूरल डेव्हलपमेंट अँन्ड एज्यूकेशन.*

३) *दांडगे सतिश, ''कृषी विपणन'', किर्ती प्रकाशन, औरंगाबाद*

४) *गायकवाड मुकुंदराव, ''शेतीमालाचा व्यापार व बाजारपेठ'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन.*

५) *महाजन मुकुंद, ''भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास'', निराली प्रकाशन, पुणे.*

६) *देसाई भालेराव, ''कृषी अर्थशास्त्र'', निराली प्रकाशन, पुणे.*

७) *देसाई भालेराव, ''कृषी अर्थव्यवस्था'', निराली प्रकाशन, पुणे.*

८) *शिंदे जगन्नाथ, ''कृषी अर्थसहाय्य योजना'' गोदावरी पब्लिकेशन, नाशिक.*